ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 8 | APRIL - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# प्राचीन भारतातील पशुपालन व पशुसंवर्धन यामध्ये स्त्रियांचे योगदान: एक अभ्यास



**Dr. Hanmant Balakrishna Nagane**
**Assistant Professor,**
**Shri Sant Damaji Mahavidyalaya, Mangalwedha**

## प्रस्तावना:

भारत देशाला प्राचीन काळापासून ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे .प्राचीन भारतातील समाजरचना मुख्यतः कृषी व पशुपालनावर आधारित असल्याचे दिसून येते. शेतीबरोबरच पशुपालन हा प्राचीन भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक होता. प्राचीन भारतीय मानवाने गाई-म्हशी, बैल, मेंढ्या, शेळ्या, घोडे यांचे पालन-पोषण करून त्यायोगे त्यावेळी आपले जीवन सुखकर करण्याचा प्रयत्न केला असावा. पशुधनामुळे मानवाला अन्न, दूध, शेतीमधील मशागतीसाठी सहकार्य आणि व्यापारासाठी, वाहतुकीसाठी साधने मिळत होती. या संपूर्ण प्रक्रियेत स्त्रियांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे प्राचीन भारतीय ऐतिहासिक संदर्भ साधनांमधून दिसून येते. घरातील दैनंदिन कामाबरोबर पशुपालन, त्यांचे संगोपन, आरोग्य, दूध प्रक्रिया आणि संवर्धन या सर्व क्षेत्रांत स्त्रिया सक्रिय असल्याचे दिसून येते.

प्राचीन भारतीय साहित्य, धार्मिक -पौराणिक ग्रंथ, पुरातत्त्वीय पुरावे आणि लोकपरंपरा यांमधून स्त्रियांच्या या भूमिकेचे अनेक उल्लेख आढळून येतात. त्यामुळे प्राचीन भारतातील पशुपालन,पशुसंवर्धन व्यवस्थेत स्त्रिया केवळ सहाय्यक नव्हत्या तर त्या पशुपालन पशुसंवर्धन व्यवस्थेच्या अग्रभागी असल्याचे दिसून येते.

## उद्दिष्टे:

१. प्राचीन भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांचे योगदान अभ्यासणे.
२. प्राचीन भारतातील पशुपालन व पशुसंवर्धन यामधील स्त्रियांचे उत्तरदायित्व अभ्यासणे.

## संशोधन पद्धत:

सदर शोध प्रबंध लिहिण्यासाठी मी ग्रंथालयीन पद्धतीचा वापर केलेला असून यामध्ये मी प्राथमिक व दुय्यम ऐतिहासिक साधनांचा वापर केला आहे.

प्राचीन भारतातील पशुपालनाची पार्श्वभूमी:

आपल्या भारताचा इतिहास हजारो वर्षांपासूनचा आहे . मानवाच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त होण्याच्या अगोदर मानव निसर्गामध्ये भटक्या अवस्थेमध्ये फिरत होता. या काळातील मानवाने नैसर्गिक गुहांमध्ये शीला खंडांवर चित्रे काढलेली आढळून येतात. मानवाला स्वतःच्या मूलभूत गरजा भागवताना कोणत्या ना कोणत्या स्वरूपात पशूंच्या संपर्कात येणे तत्कालीन परिस्थितीमध्ये क्रमप्राप्त असल्यासारखेच होते. प्राचीन भारतीय मानवाची भौतिक संपत्ती पशुवरच अवलंबून होती तरीसुद्धा मानवाचे पशुविषयी भावनिक नाते निर्माण झाले होते. यातूनच मानवाच्या मनामध्ये पशुविषयी एक अढळ स्थान निर्माण झाले. पाळीव पशुशिवाय मानवाचा जंगली पशु, पक्षी ,जलचर , सरपटणारे यांच्याबरोबरही सतत संपर्क येत होता.

कारण प्राचीन काळामध्ये जंगले भरपूर प्रमाणात होती व मानवाला वस्ती करण्यासाठी आणि उपजीविकेसाठी अशा ठिकाणीच वास्तव्य करावे लागत होते. जंगली पशुंमध्ये व इतरांमध्येही आपल्यापेक्षा वेगळी शक्ती आहे असे मानवाला वाटत होते. पशुविषयीच्या या भावनेतून मानवाने पशुपुजा करण्यास सुरुवात केली असावी. जंगली व हिंस्त्र पशु यांच्यापासून स्वतःचा बचाव व संरक्षण करण्यासाठी मानव पशुपूजा करत असल्याचे इतिहास पूर्व काळातील अवशेषावरून दिसून येते. सिंधू संस्कृतीच्या उत्खननीत अनेक ठिकाणी पशुंच्या मुद्रा सापडल्या आहेत. यातील अनेक मुद्रांवरून स्त्रियांचे पशुपालनामध्ये असलेले महत्त्व लक्षात येते. वैदिक काळापासूनच्या लिखित साहित्यातून पशुपालनाला मोठे महत्त्व असल्याचे दिसून येते. गाईला संपत्तीचे प्रतीक मानले जात होते. त्या काळात गोधन हे समृद्धीचे चिन्ह होते.

ऋग्वेद व अथर्ववेदामध्येगाईंचे महत्त्व, त्यांचे संरक्षण आणि पालन याविषयी अनेक उल्लेख आढळतात.तसेच इतर वैदिक साहित्ययामध्ये पशुपालन, गोधन व त्यांचे रक्षण याबाबत माहिती मिळते.या ग्रंथांवरून असे दिसून येते की प्राचीन भारतीय समाजात पशुधन हे आर्थिक, सामाजिक व धार्मिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे होते. त्यानंतर उत्तर वैदिक काळापासूनच, मौर्य काळ, गुप्त काळ, या कालखंडामध्ये निर्मित लिखित साहित्य तसेच इतर भौतिक पुरावे स्तंभालेख, शिलालेख यामध्ये पशूंचे उल्लेख आणि महत्त्व आढळून येते. जैन व बौद्ध धर्म साहित्यामधूनही पशुपालनाविषयीचे अनेक उल्लेख आलेले आहेत.

## स्त्रियांची पशुपालनातील भूमिका:

पशूंचे संगोपन व देखभाल यामध्येप्राचीन काळात स्त्रिया पशूंच्या दैनंदिन देखभालीची जबाबदारी पार पाडत असत. गाई-म्हशींना चारा देणे, पाणी पाजणे, गोठ्याची स्वच्छता करणे, वासरांची काळजी घेणे ही कामे प्रामुख्याने स्त्रियाच करत असत. वैदिक काळामध्ये मुलीसाठी दुहितृ हा शब्द वापरल्याचे आढळून येते. यावरून या काळात गायींचे दूध काढण्याचे काम मुली करत असल्याचे लक्ष देते. वैदिक काळामध्ये वेगवेगळ्या देवतेकडे विशिष्ट कार्यासाठी प्रार्थना केली जात होती. यामध्ये अनेक ठिकाणी स्त्री देवतांचा उल्लेख आलेला आढळून येतो. रात्री देवीची पशुरक्षक देवी म्हणून प्रार्थना केली जात होती . ईला देवीलाही पशुरक्षक देवी म्हटले जात होते . ऋग्वेदामध्ये ईलेला पशूंच्या कळपाची माता म्हणून नदीच्या गर्जनेबरोबरही तिचा संबंध जोडला आहे. दूध आणि तुपाच्या हविचे प्रतिक म्हणून ईलेचा उल्लेख केलेला आहे. ईलेला गाईपासून मिळणाऱ्या समृद्धीचे प्रतीक मानले जात होते . ब्राह्मण ग्रंथांमध्ये ईलेचा गाईचा समानार्थी शब्द म्हणून उल्लेख करून गाई बरोबर ईला देवीचा संबंध जोडला आहे . ईला दूध उत्पादनाचे प्रतिनिधित्व करते म्हणून या देवीला लोणीहस्त व लोणी पाय म्हटले आहे. रात्रीचाही रात्री देवी म्हणून अथर्ववेदामध्ये उल्लेख आहे. रात्री देवीने मेंढ्या खाणारे लोक तसेच घोडे चोरणारे चोर ,साप व सर्व घातक प्राणी दूर घालवावेत व विषारी सापाची, लांडग्याची मस्तके तोडून त्यांचा नाश करून त्यांच्यापासून पाळीव पशुंचे रक्षण करावे म्हणून प्रार्थना करण्यात येत असल्याचे उल्लेख मिळतात. या उल्लेखावरून पशुपालनामध्ये असणारे स्त्रीचे महत्व दिसून येते. ग्रामीण भागात आजही अनेक ठिकाणी ही परंपरा दिसून येते. त्यामुळे पशुपालन व पशुसंवर्धन व्यवस्थेत स्त्रिया प्रत्यक्ष सहभागी होत्या.

## दूध व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती:

पशुपालनाचा मुख्य उद्देश दूध उत्पादन हा होता. दूध काढणे, त्यापासून दही, ताक, लोणी आणि तूप तयार करणे ही कामे स्त्रियांच्या हातून केली जात असत.प्राचीन भारतीय घरांमध्ये दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याचे कौशल्य स्त्रियांकडे होते. या उत्पादनामुळे कुटुंबाची अन्नसुरक्षा वाढत असे आणि काही वेळा व्यापारासाठीही या वस्तू वापरल्या जात असत. या काळात वस्तू विनिमय पद्धत अवलंबली जात होती यामध्ये या दुग्धजन्य पदार्थांचाही महत्त्वाचा वाटा होता.

## पशुधन संवर्धन:

पशुधनाची वाढ आणि संरक्षण यामध्येही स्त्रियांची भूमिका महत्त्वाची होती. वासरांची काळजी घेणे, योग्य आहार देणे आणि पशू आजारी पडल्यास त्यांच्यावर उपचार करणे यासारख्या गोष्टी स्त्रिया पार पाडत असत.लोकवैद्यक आणि औषधी वनस्पतींचे ज्ञान स्त्रियांना असल्याने त्या पशूंच्या आजारांवर घरगुती उपचार करत असत.

## धार्मिक व सांस्कृतिक परंपरा:

प्राचीन भारतात गाई व इतर पशूंना धार्मिक महत्त्व होते. अनेक सण-उत्सवांमध्ये पशूंची पूजा केली जात असे. या काळात पशुंच्या शरीर वैशिष्ट्यांवरून स्त्रियांना काही उपमा दिल्या जात असल्याचे साहित्यिक उल्लेख आढळून येतात.हत्तीच्या चालण्याच्या गतीची तुलना मुलींच्या चाली बरोबर करण्यात येत असे व अशा मुलींना गजगती किंवा गजगामिनी म्हणून उपमा देण्यात येत असे. हरिणांचे डोळे आकर्षक असतात म्हणून सुंदर मुलींच्या डोळ्यांना हरिणांच्या डोळ्यांची उपमा देण्यात येत असे. धोबी पक्षाच्या डोळ्याची तुलना सुंदर स्त्रीच्या डोळ्याशी करण्यात येत असे. मोरांच्या केसांची उपमा तरुणींच्या केसांना दिली जात असे. नदीसुरय पक्षाचा आवाज अतिशय करूण असतो म्हणून रडणाऱ्या तरुणीच्या आवाजाची तुलना या पक्षाच्या आवाजाशी करण्यात येत असे. पशूंच्या सौंदर्याबरोबरच कुरुपतेचीही उपमा देण्यात येत असे. म्हशींच्या शिंगाची उपमा अनेक दिवस केस न विंचरलेल्या तरुणींच्या वेणीशी केली जात असे. प्राचीन भारतीय सांस्कृतिक परंपरांमध्येही स्त्रियांचे योगदान महत्त्वपूर्ण होते. आजही महाराष्ट्रात साजरा होणारा बैलपोळा या सणामध्ये स्त्रिया पशूंची पूजा करतात, त्यांना सजवतात ,त्यांच्या आरोग्यासाठी प्रार्थना करतात यावरून प्राचीन परंपरेत सुद्धा पशुधन संवर्धनात स्त्रियांचा सहभाग महत्त्वपूर्ण असल्याचा दिसून येतो.

## आर्थिक योगदान:

पशुपालनामुळे मिळणारे दूध, तूप, लोणी आणि शेणखत यांचा उपयोग शेती व व्यापारासाठी होत असे. या सर्व उत्पादन प्रक्रियेत स्त्रियांचे श्रम महत्त्वाचे होते.स्त्रिया तयार करत असलेल्या दुग्धजन्य पदार्थांची विक्री करून कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होत असे. त्यामुळे पशुपालन हा स्त्रियांच्या आर्थिक योगदानाचा महत्त्वाचा स्रोत होता.

सामाजिक महत्त्व:

प्राचीन भारतीय समाजात स्त्रियांना घरगुती व्यवस्थापनाची जबाबदारी होती. पशुपालन हा त्या व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग होता.पशुधनाचे संरक्षण केल्यामुळे कुटुंबाची आर्थिक स्थिरता टिकून राहात असे. त्यामुळे स्त्रियांच्या कामामुळे समाजाची आर्थिक व सामाजिक रचना मजबूत होत होती. प्राचीन भारतातील माणसाचा सामाजिक दर्जा त्याच्याकडे असणाऱ्या पशुधनांवरून ठरविला जात असे. प्राचीन भारतामध्ये विवाह हा माणसाच्या आयुष्यातील महत्त्वाचा संस्कार मानला जात होता. मानवाची ग्रहस्थाश्रमाची सुरुवात विवाह संस्काराने सुरू होत असे. त्यामुळे पशुपालन व्यवसाय वैवाहिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा समजला जात असे. मुला मुलींचे विवाह करताना पशुपालनावरुन सामाजिक दर्जा पाहून विवाह केले जात होते. प्राचीन भारतीय साहित्यामध्ये विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत. आठ विवाह प्रकारापैकी आर्षविवाह प्रकारामध्ये वरपक्ष कन्या पक्षाला विवाहाच्या वेळी एक गाय आणि एक बैल देत असत. हा युवा प्रकार म्हणजे पशु देऊन कन्या विकत घेतल्यासारखा होता. आर्ष प्रकारचा विवाह शक्यतो ज्यांच्याकडे पशु भरपूर आहेत परंतु काही कारणाने त्यांच्या मुलाचा विवाह होत नसल्यास समाजातील गरीब असणाऱ्या मुलींच्या पित्याला पशु देऊन त्यांची कन्या वधू म्हणून स्वीकारली जात असे .प्राचीन भारतामध्ये विवाहाच्या वेळेस कन्यादान करताना त्याबरोबर पशुधन दिले जात होते. ऋग्वेदामध्ये असा उल्लेख आहे की हे वधू तू शांत दृष्टीची हो ,पतीला घातक असू नकोस, पशुंना हितकर अस, पशुंना सुख देणारी हो या उल्लेखावरून या काळामध्ये विवाह व पशुधन आणि यामध्ये असणारा स्त्रीचा संबंध लक्षात येतो.

## पुरातत्त्वीय व साहित्यिक पुरावे:

पुरातत्त्वीय संशोधनातून सिंधू संस्कृतीतही पशुपालनाचे महत्त्व दिसून येते.हिंदू संस्कृतीच्या वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात आलेल्या उत्खलनामध्ये सापडलेल्याशिक्के, मूर्ती आणि अवशेषांमधून गाई-बैल व इतर पशूंचे महत्त्व स्पष्ट होते.तसेच प्राचीन साहित्य, बौद्ध जातक कथा ,जैन साहित्य ,सातवानकालीन शिलालेख, ग्रंथ, पुराणे आणि लोककथा यांमधूनही स्त्रियांच्या पशुपालनातील सहभागाचे उल्लेख मिळतात.

## निष्कर्ष:

प्राचीन भारतातील पशुपालन आणि पशुसंवर्धन या क्षेत्रांत स्त्रियांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. मानव समाजाची प्रगती होत असताना मानवाला पशुंचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले आणि यामध्ये पुरुषांबरोबर स्त्रियांचेही पशुपालन व

पशुसंवर्धन यामध्ये बहुमोल असे योगदान असल्याचे दिसून येते. प्राचीन भारतीय समाज व्यवस्था आणि अर्थव्यवस्था यामध्ये पशु हा मानवाचा अविभाज्य घटक होता .मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीच्या प्रत्येक अवस्थेमध्ये पशुचे बहुमोल योगदान मानवाला लाभले आहे .प्राचीन भारतीय समाज टिकून राहण्यासाठी, समाजाचा विकास होण्यासाठी, समाजाला स्थैर्य प्राप्त होण्यासाठी, मानवाने स्वतःच्या बुद्धी कौशल्याचा वापर करून पशुचा अनेक ठिकाणी उपयोग करून घेतला. मानवाला स्थैर्य प्राप्त झाल्यानंतर मानवाच्या वाढणाऱ्या गरजांची पूर्तता पशूंच्या सहयोगाने व पशुपालनामुळे मानवाला करता आली. प्राचीन भारतीय समाजामध्ये मानवाच्या आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू पशु हाच होता. मानवी विकासाच्या या प्रत्येक अवस्थेमध्ये स्त्रियांनी पशुसंवर्धन आणि पशुपालन यामध्ये आपले योगदान दिल्याचे दिसून येते. पशूंचे संगोपन, दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती, पशुधन संवर्धन, आर्थिक मदत आणि धार्मिक परंपरा या सर्व क्षेत्रांत स्त्रिया सक्रिय होत्या.त्यांच्या परिश्रमामुळे प्राचीन भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत झाली आणि समाजाच्या विकासाला हातभार लागला. त्यामुळे प्राचीन भारतातील पशुपालन व्यवस्थेच्या यशामागे स्त्रियांचे योगदान अत्यंत मोलाचे मानावे लागते. आजही ग्रामीण भागामध्ये पशुपालन पशुसंवर्धन यामध्ये क्रिया अग्रभागी असल्याचे दिसून येते.

## संदर्भ साधने:


1) जोशी लक्ष्मण शास्त्री, वैदिक संस्कृतीचा विकास, प्राज्ञ पाठशाळा वाई,1972
2) जयस्वाल ज्ञानेश्वरी, प्राचीन भारत मे पशुपालन ,जानकी प्रकाशन दिल्ली,1987
3) चित्राव सिद्धेश्वर शास्त्री, ऋग्वेदाचे मराठी भाषांतर, लोकसंग्रह छापखाना पुणे,1969
4) राय रामकुमार, वैदिक माइथाॅलाॅजी, चौखंबा विद्याभवन, वाराणसी 1961
5) गोखले शोभना, पुराभिलेख विद्या, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे,1975
6) शर्मा रामशरण, प्राचीन भारतीय समाज व्यवस्था व अर्थव्यवस्था लोकवाङ्मय गृह,मुंबई,1978